लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या शासन निर्णय दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३ च्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ (श्री. कैलाश राजकौर व इतर वि. महाराष्ट्र शासन) प्रकरणी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.....

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः- सफाई-२०२४/प्रक्र.१६/सआक**

मंत्रालय, विस्तार, मुंबई- ४०००३२

दिनांक :- ११ मार्च, २०२४.

वाचा :-

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग पत्र क्र. संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५ दिनांक २६.०९.२००८
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे पत्र क्र. संकीर्ण-२००८/यादी/प्र.क्र.५५३/मावक-५ दिनांक १५.०४.२०१०
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग शासन निर्णय क्र. सफाई-२०१८/प्र.क्र.४६ /सआक दिनांक २४.०२.२०२३
४. मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ प्रकरणी दिलेले दिनांक १०.०४.२०२३ चे आदेश
५. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे पत्र क्र. सफाई-२०२३/प्र.क्र.४७/सआक, दिनांक ०७.०८.२०२३
६. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाचे पत्र क्र. सफाई-२०२३/प्र.क्र.१०३/सआक, दिनांक २४.०८.२०२३

**प्रस्तावना -**

लाड समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने सफाई कामगारांच्या वारसा हक्काच्या अंमलबजावणीबाबत संदर्भ क्र. ३ येथील दिनांक २४.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत तरतूदी विहित करण्यात आल्या आहेत. तथापि, मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ, औरंगाबाद यांनी रिट याचिका क्र. ३९५०/२०२३ (श्री. कैलाश राजकौर व इतर विरूध्द महाराष्ट्र शासन) प्रकरणी दि.१०.४.२०२३ रोजी "In view of the above and considering the law laid down by the Hon'ble Supreme Court in Ahmednagar mahanagar Palika Kamgar Union 2022 to SSC 172, we direct that the State Government would refrain from extending the benefits of the Government Resolution dated 24 th February, 2023 until further orders, save and except to the legal heirs of the those employment, who belong to Walmiki, Mehatar and Bhangi Communities" याप्रमाणे आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाचे अवलोकन केले असता, मा.उच्च न्यायालयाने केवळ वाल्मिकी, मेहतर व भंगी या समुदायातील सफाई कामगारांच्या पात्र वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याकरीता सूट दिली असून या समुदायांव्यतिरिक्त इतर जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यास स्थगिती दिलेली आहे. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाच्या अनुषंगाने

संदर्भ क्र. ५ येथील दिनांक ७.८.२०२३ च्या पत्रान्वये सर्व आयुक्त, महानगरपालिका व आयुक्त तथा संचालक नगरपालिका प्रशासन संचालनालय यांना तसेच संदर्भ क्र. ६ येथील दि. २४.०८.२०२३ च्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्त तसेच सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयांचे कार्यालय प्रमुख यांना उपरोक्त न्याय निर्णयानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, काही लोकप्रतिनिधींकडून या विभागाच्या दिनांक ०७.०८.२०२३ रोजीच्या पत्रात केवळ मेहतर, भंगी व वाल्मिकी जातीचा उल्लेख केलेला आहे. परंतू संदर्भाधीन अनु.क्र.१ च्या शासन पत्रासोबतच्या यादीतील अनुसूचित जातीच्या यादीचे अवलोकन केले असता त्यात अ.क्र.१२ वर सदर जातींबरोबर ओलगाना, रूखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, कोरार, झाडमल्ली व हेला या परंपरागत सफाईचे काम करणाऱ्या जातींचा व अनु.क्र.१९ वरील डोम,डुमार या जातींचा समावेश करण्याची विनंती करण्यात आली असल्याने त्यांना वारसा हक्काचा लाभ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**-संदर्भ क्र. १ येथील दिनांक २६.९.२००८ व संदर्भ क्र. २ येथील दि. १५.०४.२०१० च्या शासन पत्रान्वये महाराष्ट्र राज्याची अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासवर्ग यांची यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. सदर यादीतील अनुसूचित जातीच्या यादीमध्ये अनु.क्र.१२ वर भंगी, मेहतर व वाल्मीकी या जातींबरोबर ओलगाना, रूखी, मलकाना, हलालखोर,लालबेगी,कोरार, झाडमल्ली व हेला या जाती / उपजातींचा देखील समावेश करण्यात आला आहे. सदर जाती/उपजाती या वाल्मिकी, मेहतर व भंगी समुदायातील असल्याने मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेश विचारात घेता ओलगाना, रूखी, मलकाना, हलालखोर, लालबेगी, कोरार, झाडमल्ली व हेला या जाती/उपजातींमधील तसेच अनु.क्र.१९ वरील डोम,डुमार या जातीमधील उमेदवारांना संदर्भ क्र. ३ येथील दि. २४.२.२०२३ च्या शासन निर्णयातील अटी व शर्तीचे तसेच मा. उच्च न्यायालयाच्या उपरोक्त आदेशाचे संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेकडून काटेकोरपणे पालन करण्यात येईल, या अटीच्या अधीन वारसा हक्काने नियुक्ती देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे मा. राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ISSUED ११।३।२४

११/०३/२०२४

(सतीश खैरमोडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत-

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व मा. मंत्री/सर्व मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. विधानमंडळाच्या सर्व समित्यांचे प्रमुख, विधानमंडळ, मुंबई,
५. मा. विधानसभा/विधान परिषद सदस्य, विधानमंडळ, मुंबई,
६. मा. मुख्य सचिव यांचे सह सचिव, मुख्य सचिवांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
७. सर्व अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई,
८. सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
९. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०. प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ/अपील शाखा), मुंबई,
११. प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त, मुंबई,

१२. आयुक्त, राज्य निवडणूक आयोग, मुंबई,
१३. सर्व विभागीय आयुक्त, महसूली विभाग,
१४. आयुक्त, समाजकल्याण, पुणे,
१५. आयुक्त, अपंग कल्याण संचालनालय, पुणे,
१६. आयुक्त तथा संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, मुंबई,
१७. मुख्य अभियंता, सा.बां. मंडळ, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई,
१८. प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे,
१९. महासंचालक, माहिती व जनसंपर्क कार्यालय, मंत्रालय, मुंबई,
२०. महासंचालक आणि पोलिस महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, महासंचालक,
२१. महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे,
२२. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई,
२३. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र संचालनालय, मुंबई.
२४. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२५. शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
२६. संचालक, वैद्यकीय शिक्षण संचालनालय, मुंबई,
२७. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई,
२८. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
२९. सर्व जिल्हाधिकारी,
३०. आयुक्त, सर्व महानगर पालिका,
३१. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
३२. मुख्याधिकारी, सर्व नगर परिषदा,
३३. सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण,
३४. सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण,
३५. सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद,
३६. सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती,
३७. सर्व सह/उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, सा.न्या. व वि.स. विभाग, मंत्रालय, मुंबई
३८. निवडनस्ती/ अजाक (सआक).

Note २०२३

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
दूरध्वनी क्र.४०६१ २२७९-०२२.
Email : sandeep.jadhav@nic.in
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२

क्रमांक-सफाई/२०२४-प्र.क्र.१६/सआक दिनांक : ११ मार्च, २०२४

वाचा- १. शासन निर्णय क्रमांक.सफाई २०१८/प्र.क्र.४६/सआक, दिनांक २४.२.२०२३
२. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण,मुंबई Original Application क्र .८२/२०२३ मध्ये दिनांक ५.१.२०२४ रोजी दिलेले आदेश

सुधारणा / शुध्दीपत्रक - .

संदर्भाधिन अनु.क्र.१ च्या शासन निर्णयातील अनु.क्र. ३ वरील वारसा हक्कास पात्र ठरणारे सफाई कामगारांचे वारस व अनु.क्र. ८ मधील सफाई कामगारांच्या वारसा हक्कासंबंधात इतर तरतूदी मध्ये अनु.क्र. ८.१ व ८.४ मधील तरतूदींमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

१. शासन निर्णय दिनांक २४.२.२०२३ मधील अनु. क्र. ३ वरील वारसा हक्कास पात्र ठरणारे सफाई कामगारांचे वारस या सदरात सफाई कर्मचा-याच्या विवाहीत मुलीचा समावेश करण्यात येत आहे.
२. शासन निर्णय दिनांक २४.२.२०२३ मधील अनु. क्र. ८ मधील सफाई कामगारांच्या वारसा हक्कासंबंधात इतर तरतूदी मधील अनु.क्र. ८.१ मधील लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्र देण्याची अतिरिक्त अट तसेच अनु. क्र. ८.४ मध्ये नमूद नियुक्ती देण्यापूर्वी जातवैधता प्रमाणपत्र प्राप्त करून घेण्याची अट वगळण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ISSUED

(सतीश खैरमोडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत.

१. आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२. सर्व प्रादेशिक उपायुक्त/ सहायक आयुक्त/ जिल्हा समाजकल्याण अधिकारी, महाराष्ट्र.

Note २०२३